
# समिती दर्पण

डिसेंबर २०२४

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


# कृषिपुत्रांना मिळाले शेतीपूरक उद्योगांचे धडे

## ॲग्रीबिझ कनेक्ट- २०२४ उद्योजकता परिषद, ३०० मुलामुलींचा सहभाग




*विद्यार्थी साहाय्यक समिती आयोजित उद्योजकता परिषदेत मान्यवरांसह व्यवस्थापनातील विद्यार्थी*

समितीत वास्तव्यास असणारी बहुतांश मुलेमुली ही शेतकरी कुटुंबातील आहेत. उच्चशिक्षण घेऊन नोकरीच्या मागे न लागता, घरातील शेतीतूनच किंवा शेतीच्या अनुभवातून एखादा शेतीपूरक व्यवसाय करून उद्योजकतेची कास त्यांनी धरावी, या उद्देशाने समितीने यंदा कृषीपूरक व्यवसायांवर आधारित ॲग्रीबिझ कनेक्ट २०२४ परिषद आयोजित केली होती.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या शारदाबाई गोविंदराव पवार उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित ही तिसरी उद्योजकता परिषद ता. २२ डिसेंबर रोजी पर्सिस्टंट कंपनीच्या देवांग मेहता सभागृहात पार पडली. या परिषदेत समितीतील ३०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या परिषदेत मोर्डे फूड प्रायव्हेट लि.चे हर्षल मोर्डे, बारामती ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे नीलेश नलावडे, सिंजेंटा फाउंडेशन इंडियाचे गजानन राजुरकर, फार्मर प्रोड्युसर ऑर्गनायझेशनचे व्यंकट सिंधफळे यांनी आपल्या अनुभवकथनातून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे दिले.

उद्योजकता विकास केंद्राच्या प्रमुख डॉ. ज्योती गोगटे यांनी प्रास्ताविक केले. समितीचे कार्यकारी विश्वस्त माननीय तुषार रंजनकर यांनी समितीची माहिती सांगितली. त्यानंतर कार्यक्रमाचे डिजिटल उद्‌घाटन करण्यात आले. समितीची विद्यार्थिनी साक्षी थोरात हिने शेतकरी उद्योजक या विषयावर कविता सादर केली.

समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजन यांच्यासह समितीचे विश्वस्त व कार्यकर्ते, माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, पर्यवेक्षक उपस्थित होते.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात समितीचे माजी विद्यार्थी संभाजी सातपुते (ईस्ट एशिया ॲग्रोटेक), दिनेश शेळके (सोल फ्रेश ॲग्रोटेक), नीलेश रासकर (नंदी ग्रीन सोल्युशन), पवन दळवी (कृषियंत्र तंत्रज्ञ) यांनी उद्योजक कसे झालो, याचा प्रवास उलगडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जीवन बोधले याने केले. हेमंत राजहंस यांनी आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांनी केले. उद्योजकता परिषदेचे तिसरे सत्र लजपत संकुलाच्या आवारात झाले. विद्यार्थ्यांचे ९ गट तयार करून प्रमुख पाहुणे आणि उद्योजक माजी विद्यार्थ्यांमधून प्रत्येक गटासाठी एक मेंटॉर व एक गटप्रमुख नेमण्यात आला. उद्योग आणि उद्योजकता याविषयीच्या प्रश्नांची उत्तरे या सत्रात विद्यार्थ्यांना मिळाली. त्याचबरोबर त्यांच्या अनेक शंकांचे निरसनही झाले.

त्यापूर्वी आवारातच शेतीवर आधारित, प्रादेशिक वैशिष्ट्य असणारे व इतर असे १२ स्टॉल विद्यार्थ्यांनी उभारले होते. त्यात कृषीवर आधारित पुस्तके, खाद्यपदार्थ, सौंदर्य प्रसाधने यांचा समावेश होता.





### दिनदर्शिकेचे प्रकाशन

समितीच्या सन २०२५ या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उद्योजकता परिषदेच्या दरम्यान मान्यवरांच्या हस्ते झाले. या बारा पानी दिनदर्शिकेत इंग्रजी महिन्यांतील तारखांबरोबरच मराठी महिन्यांतील तिथी, सणवार यांची माहिती आहे. प्रत्येक महिन्याच्या मागील पानावर समितीविषयी माहितीचे लेख आहेत. दिनदर्शिकेच्या ४ हजार प्रती काढण्यात आल्या असून जाहिरातींच्या माध्यमातून संपूर्ण खर्च करण्यात आला आहे. समितीचे कार्यकर्ते, हितचिंतक, स्नेही यांना या दिनदर्शिकेचे मोफत वितरण करण्यात येत आहे.




*समितीच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना डावीकडून चंद्रकांत कुलकर्णी, व्यंकट सिंधफळे, तुषार रंजनकर, हर्षल मोर्डे, प्रतापराव पवार, डॉ. ज्योती गोगटे, गजानन राजूरकर व हेमंत राजहंस.*

समितीची दिनदर्शिका पाहण्यासाठी वर दिलेला QR code स्कॅन करा



### युवा उद्योजिकेला १ लाखाचे बीजभांडवल

यावेळी समितीची माजी विद्यार्थिनी, युवा उद्योजिका कीर्ती हासे हिला एक लाख रुपयांचे बीज भांडवल देण्यात आले. समितीकडून मिळणाऱ्या या बीजभांडवलाचा गेल्यावर्षी लाभार्थी ठरलेला युवा उद्योजक सुरज कुलकर्णी याने उद्योगातील नफ्यातून ती रक्कम परत केली.

> कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) वापर आता कृषी क्षेत्रात होत आहे. बारामती ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने या तंत्रज्ञानावर आधारित ॲप तयार केले आहे. ज्याचा उपयोग शेतकऱ्यांना ऊसउत्पादन वाढीसाठी होत आहे. लवकरच फळे आणि भाजीपाल्यासाठीही या तंत्राचा उपयोग केला जाणार आहे.
>
> - **नीलेश नलावडे,**
> बारामती ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट

> उद्योगामध्ये जोखीम पत्करण्याची तयारी लागते, जी कृषी क्षेत्रात सर्वांत जास्त असते आणि ती पेलण्याची क्षमता शेतकऱ्यांमध्ये असते. त्यामुळे समितीतील मुलांमध्ये हा गुण आहेच. गरज आहे ती आत्मविश्वास, कौशल्य विकास आणि आर्थिक नियोजनाची.
>
> - **हर्षल मोर्डे,**
> मोर्डे फूड प्रॉडक्टस् प्रायटेव्ह लि.

> हृदयात आग असेल, तर आपण कोणतेही ध्येय साध्य करू शकतो. जेवढे मोठे संकट, तेवढी मोठी संधी असते. जीवनातील प्राधान्यक्रम ठरवायला हवा. आर्थिक गोष्टीचे भान हवे. वेळ, शिस्तीचे पालन केले पाहिजे. सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे.
>
> - **प्रतापराव पवार,**
> अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

> कृषी क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग, संशोधन होत आहे. त्यातून अनेक संधी उपलब्ध होत आहेत. त्या शोधा आणि उद्योग सुरू करा. सिन्जेंटा फाउंडेशनने १३ राज्यांत २००० उद्योजक घडवले आहेत. यामध्ये महिलांचा सहभाग ५३ टक्के आहे. या कामातून शाश्वत विकासाचे ध्येय गाठणे शक्य होत आहे.
>
> - **डॉ. गजानन राजूरकर,**
> सिन्जेंटा फाउंडेशन

> शेतकरी हा अन्नदाता आहेच, त्याने ऊर्जादाता व्हायला हवे. शेतकरी उद्योजक होत असताना ५ F महत्त्वाचे आहेत, Fruit, Food, Fertilizer, Feed, Fuel. यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाला पुनर्विचार (Rethink) आणि पुनर्रचना (Redesign) करावी लागेल.
>
> - **व्यंकट सिंधफळे,**
> सिंधफळे ॲग्रो प्रॉडक्टस्

# रोबोटिक्सचे ज्ञान आणि अर्थार्जनाची संधीही

## तेलंगणाच्या सोहम ॲकॅडमीतर्फे कार्यशाळा, ७० विद्यार्थ्यांचा सहभाग




रोबोटिक्स क्षेत्रातील ज्ञान ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याचे काम करणाऱ्या तेलंगणातील सोहम ॲकॅडमी या संस्थेने समितीच्या लजपत भवन वसतिगृहात ५ डिसेंबर रोजी "Train the Trainer" कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेमध्ये समितीतील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मुलांना केवळ रोबोटिक्सचे ज्ञान मिळाले नाही, तर पुण्यातील पाच शाळांतील विद्यार्थ्यांना ते शिकवून अर्थार्जनाची संधीही मिळाली.

अमेरिकेत यशस्वी जीवन जगत असलेले सहदेव कोमारागिरी यांनी समाजासाठी काहीतरी भरीव करण्याचा निर्णय घेतला आणि सन २०१७ मध्ये भारतात परत येऊन सोहम ॲकॅडमीची स्थापना केली. त्यांच्या नेतृत्वाखाली सोहम ॲकॅडमीने आतापर्यंत भारतभरातील ५५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना रोबोटिक्सचे प्रशिक्षण दिले आहे. शालेय विद्यार्थ्यांचा तंत्रज्ञानाशी परिचय करून देत, त्यांना या क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी प्रेरित करणे, हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

तेलंगणात प्रचंड यश मिळवल्यानंतर सोहम ॲकॅडमीने महाराष्ट्रात विस्तार करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रात प्रवेश करण्यासाठी त्यांनी पुण्यातील विद्यार्थी साहाय्यक समितीशी संपर्क साधला. यासाठी माजी विद्यार्थी तुषार काकडे यांनी पुढाकार घेतला. समितीने नेहमीच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व तांत्रिक विकासाला प्रोत्साहन दिले आहे आणि याच विचारातून "Train the Trainer" या नाविन्यपूर्ण कार्यशाळेचे आयोजन झाले.

या कार्यशाळेमध्ये प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रगत रोबोटिक्स किटद्वारे २१ वेगवेगळे प्रयोग शिकवले. या प्रगत किटमध्ये विविध प्रकारचे सर्किट्स, सेन्सर्स, मोटर्स, प्रोग्रामेबल चिप्स आणि इतर घटकांचा समावेश आहे, जे प्रकल्प तयार करण्यासाठी आवश्यक असतात. या किटचा वापर करत विद्यार्थी केवळ तांत्रिक ज्ञान शिकले नाही, तर शालेय विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आवश्यक कौशल्येही आत्मसात केली. हुतात्मा बालवीर शिरीषकुमार माध्यमिक विद्यालय, लक्ष्मणराव आपटे प्रशाला, एनएमव्ही हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, एरंडवणे माध्यमिक विद्यालय, आणि न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे या शाळांमध्ये सातवी ते नववीच्या वर्गातील सुमारे १०० विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले.

पाच शाळांतील ५०० विद्यार्थ्यांनी रोबोटिक्सचे ज्ञान मिळवले. या उपक्रमामुळे केवळ तांत्रिक ज्ञानाचा प्रसार झाला नाही, तर समितीतील विद्यार्थ्यांना शिकवून अर्थार्जनाचीही संधी मिळाली. सोहम ॲकॅडमीने समितीच्या प्रत्येक वसतिगृहाला प्रगत रोबोटिक्स किट दिली आहेत. या किटद्वारे विद्यार्थी प्रकल्प तयार करून आपले कौशल्य विकसित करू शकतात.

कार्यशाळेनंतर सोहम ॲकॅडमीचे संस्थापक सहदेव कोमारागिरी यांनी समितीला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या ऊर्जा, सहभाग, आणि नवकल्पनांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी सोहम ॲकॅडमी आणि विद्यार्थी सहाय्यक समिती यांच्या समान ध्येयांचा उल्लेख केला, ज्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला.

ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर आणि हेमंत राजहंस यांनी प्रयत्न केले.



## मेलबर्न दौरा
## एक समृद्ध अनुभव

**- आरती चासकर** (डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह)

ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठात एका संशोधन शिबिरात सहभागी होण्याची अतुलनीय संधी मला मिळाली. ता. १७ ते २८ नोव्हेंबर या कालावधीत हे शिबिर झाले.

मी मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स, शिवाजीनगर येथे ब्लेंडेड बायोसायन्समध्ये बीएस्सी करत आहे. या महाविद्यालयाने मला ही संधी उपलब्ध करून दिली. शिबिरासाठी निवड प्रक्रिया ही शैक्षणिक कामगिरी आणि गुणांवर आधारित होती.या दौऱ्यात अनेक गोष्टी मी पहिल्यांदा अनुभवल्या. जसे की, पहिला विमानप्रवास, पहिला परदेश दौरा. मेलबर्नला पोचल्यानंतर विमानतळापासून विद्यापीठापर्यंत वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली होती. दुसऱ्या दिवसाची सुरुवात पारंपरिक चहापानाने झाली, जिथे आम्ही प्राध्यापकांना भेटलो. नंतर कॅम्पस फेरफटका आणि आनंददायी बार्बेक्यू डिनर होते.

शिबिरात तस्मानियन वाघाचे विलुप्त होणे, जैवविविधता संवर्धन, गव्हातील लोहाचे प्रमाण वाढवणे आणि विविध बायोटेक ॲप्लिकेशन्स यांसारख्या विषयांवर व्याख्याने आणि प्रयोगशाळा भेटींचा समावेश होता.

आठवड्याच्या शेवटी, आम्ही ऐतिहासिक मेलबर्न क्रिकेट मैदानाला भेट दिली, जिथे सचिन तेंडुलकर, डॉन ब्रॅडमन आणि विराट कोहली यांसारखे दिग्गज क्रिकेटपटू खेळले आहेत. स्टेडियममध्ये रग्बी, फुटबॉल आणि ॲथलेटिक्स यासारख्या खेळांमधील संस्मरणीय वस्तूंचे संग्रहालयही आहे.

आम्ही मेलबर्न शहरातील व्हिक्टोरिया बोटॅनिकल गार्डन यांसारख्या ऐतिहासिक स्थळांना भेट दिली, ज्यामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या आठवणी आहेत. लिगॉन स्ट्रीट, व्हिक्टोरिया आर्ट म्युझियम आणि यारा नदी, स्कायडेक- मेलबर्नमधील सर्वात उंच इमारतही पाहिली. दोलायमान व्हिक्टोरिया मार्केटला भेट दिली.

शिबिराच्या समारोप प्रसंगी मेलबर्न विद्यापीठाच्या प्रवेशाच्या निकषांवर पूर्णत्वाचे प्रमाणपत्र आणि मार्गदर्शन मिळाले. हे शिबिर एक समृद्ध करणारा अनुभव होता. शिक्षण आणि संस्कृतीचा मिलाफ होता. वरिष्ठांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. करिअरसंदर्भात मौल्यवान सल्ला मिळाला. आता मी सर्वांच्या संपर्कात राहीन. भविष्यातील संधींसाठी या अनुभवाचा मला नक्कीच फायदा होईल.

या संपूर्ण प्रक्रियेत मला विद्यार्थी साहाय्यक समितीचे सहकार्य लाभले. पर्यवेक्षिका सविता भुक्ते यांनी मदत केली. पाल्य-पालक योजनेतून मिळालेल्या पालकांनीही खूप प्रेरित केले.

## सुजाता जाधव हिचे यूपीएससीमध्ये यश




समितीची माजी विद्यार्थिनी सुजाता जाधव हिने नुकतेच यूपीएससी परीक्षेत यश मिळविले. तिची इंडियन स्टॅटिस्टिकल ऑफिसर (भारतीय सांख्यिकी अधिकारी) या पदावर निवड झाली आहे. या परीक्षेत देशात बावीसावी व महाराष्ट्रात पहिली आली. या पदावर निवड झालेली ती एकमेव महाराष्ट्रीय विद्यार्थिनी आहे. शेतकरी कुटुंबातील सुजाताने बारावीनंतर विद्यार्थी साहाय्यक समितीत राहून पदवीचे शिक्षण घेतले. समिती हा वटवृक्ष आहे, त्याच्या छायेत चांगले संस्कार झाले, अशी भावना सुजाता जाधव हिने व्यक्त केली. तिला लीला पूनावाला शिष्यवृत्ती, सरकारी इन्स्पायर स्कॉलरशिप मिळाली होती.

## पर्वती दर्शनातून मुलींना पुण्याची ऐतिहासिक माहिती

पुण्यातील ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याची संकल्पना समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी मांडली. उच्च शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या मुलींना शहराची माहिती व्हावी, नवनवीन गोष्टी अनुभवायला व शिकायला मिळाव्या, हा मागील उद्देश आहे. त्यानुसार समितीतील १४ विद्यार्थिनींनी १५ डिसेंबरला पर्वतीला भेट दिली. पर्यवेक्षिका मोनिका शिंदे यांनी या सहलीचे नियोजन केले. सकाळी साडेसहाला बसने सर्व जणी निघाल्या. पर्वतीवर गेल्यानंतर तेथील पेशवे म्युझियम पाहिले. लक्ष्मी मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर व इतर प्राचीन गोष्टीं पाहायला मिळाल्या. तेथील अन्य मंदिरांमध्येही दर्शन घेतले. पर्वती उतरून खाली आल्यावर पुण्याचे खास आकर्षण असलेल्या सारसबागेला भेट दिली, तेथील सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले.



## परांजपे, भागवत यांची कॉर्पोरेट क्षेत्राविषयी व्याख्याने


कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व विकास तसेच स्वयंविकासावर आधारित सत्र लजपत संकुलात झाले. यात पराग परांजपे व राजीव भागवत यांची व्याख्याने झाली. पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या ६५ विद्यार्थ्यांनी या सत्रात सहभाग घेतला. कॉर्पोरेट क्षेत्रात प्रवेश कसा करावा, त्यातील संधी कोणत्या, बायोडेटा कसा लिहावा, मुलाखतीदरम्यान स्वतःला कसे सादर करावे, याविषयी वक्त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्री. परांजपे आणि श्री. भागवत यांनी कॉर्पोरेट क्षेत्रातील आपले अनुभव सांगत या क्षेत्रातील इंग्रजीचे महत्त्व आणि ते कसे सुधारावे, मुलाखती कशा घेतल्या जातात, नोकरी मिळविण्यासाठीची कौशल्ये, संधी या संदर्भात माहिती दिली. "AI is boon or bane for society" या विषयावर गटचर्चा झाली. यावेळी विद्यार्थ्यांचा मॉक इंटरव्ह्यूही घेण्यात आला.



### मैत्री पुस्तकांशी

## तरुणाईला प्रेरणा देणारे आत्मकथन

**- प्रेरणा मालुसरे**





लेखक भरत आंधळे यांनी आपला जीवन प्रवास 'गरुडझेप- एक ध्येयवेडा प्रवास' या पुस्तकात मांडला आहे. प्रतिकूल परिस्थितीत दहा वर्षे संघर्ष करत यूपीएससी परीक्षेत मिळविलेल्या यशाची कथा लेखकाने सांगितली आहे. तरुणाईला दिशा देणारे, विद्यार्थ्यांपासून पालकांपर्यंत सर्वांनी वाचावे, असे हे पुस्तक आहे. अपयशाची भीती घालवून पुन्हा प्रयत्नवादी बनण्याची प्रेरणा हे पुस्तक देते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची ऊर्जा देते. आयुष्यात विशिष्ट ध्येय ठेवले, कामामध्येच देव पाहिला, तर अशक्य काहीच नसते, हा धडा या पुस्तकातून मिळतो. लेखकाची साधी, सोपी आणि ओघवती भाषाशैली वाचकाला खिळवून ठेवते.

**पुस्तकाचे नाव : गरुडझेप- एक ध्येयवेडा प्रवास**
**लेखक : भरत आंधळे**

## Guidance to create positive anchors

**- Mehandi Badade**




The book 'Miracle Anchors' written by Narendra Goidani is basically a motivational book, which gives us the ray of light in our life journey. In this book writer tells us what Miracle Anchor is? How it affects our behaviors & our decisions. It guides us how to create positive anchors. Anchors are our previous beliefs which we have before doing any work or making any conclusion. This book teaches us that our happiness or our satisfaction depends on our attitude towards anything. If you want positive approach and some motivation, then definitely read this book.

**Book name : Miracle Anchors**
**Author : Narendra Goidani**